## निविदा क्र. ५३

## हडपसर कमर्शिअल इमारती मधील तळ मजल्यावरील गाळा क्र. बी/६ क्षेत्रफळ २७८ चौ. फुट जागा लिव्ह ॲण्ड लायसेन्सने देणेकामी निविदा

## ''अ'' पाकिट

अर्जाची किंमत (जीएसटीसह) :– रक्कम रू: २,००६/–

निविदा बयाणा :– रक्कम रुपये : ८,५००/–

महाटेंडर प्रोसेसिंग फी रक्कम रू. ५००/–

परिवहन महामंडळाने निर्धारित केलेले निव्वळ मासिक भाडे: रु. २४,५४७/– (चोवीस हजार पाचशे सत्तेचाळीस केवळ) (जीएसटी, म.न.पा. व पाणी दर इतर कर वगळुन) यापेक्षा अधिकची रक्कम निविदाधारकाने फॉर्म 'ब' मध्ये नमुद करावयाची आहे.

१) अर्जदार संस्थेचे नाव : ....................................................................................................

संपुर्ण पत्ता :..........................................................................................................

..........................................................................................................................

२) नोंदणीकृत व्यवसायाचा वर्ग:–..................................................................................

३) संपर्क क्रमांक....................................ईमेल आयडी :......................................................

४) बयाणा रक्कम ऑनलाईन www.mahatenders.gov.in या पोर्टलवर भरणे आवश्यक आहे.

### निविदाधारकाने खालील नमूद केलेली मूळ कागदपत्रे स्कॅन करून जोडावीत.

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र

२) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र

३) आधारकार्ड

४) पॅनकार्ड

५) मागिल ३ वर्षांचा आयकर भरणा तपशील

६) खाजगी निविदाधारकाने / संस्थेने स्वत:च्या/कुटूंबियांच्या मालमत्तेचे मालमत्ता पत्रक/७/१२ पत्रक जोडावे.

७) निविदाधारकाचे कुटुंबिय परिवहन महामंडळाच्या सेवेत आहेत/नाहीत याबाबत माहितीचे रु. ५००/– चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र,

वरीलप्रमाणे दिलेली माहिती ही सत्य असून त्याबाबतची सर्व जबाबदारी माझी राहील. तसेच उपरोक्त क्र १ ते ७ ही कागदपत्रे स्कॅन करून सोबत जोडलेली आहेत.

अर्जदाराची स्वाक्षरी

स्थळ : पुणे

दिनांक:...../...../२०२४

## प्रतिज्ञापत्राचा नमुना (रू. ५०० च्या स्टॅम्प पेपरवर लिहीणे)

सुधारित निविदा कार्यप्रणाली कलम २:१:२ नुसार निविदाधारकाने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्रक सुधारित निविदा कार्यप्रणाली आदेश क्र. द/६७५ दि. २९/०३/२०११ चे कलम २:१ अंतर्गत निविदापुर्व तपासणी कलम २:१:२ नुसार पुणे परिवहन महामंडळाच्या सेवेमध्ये किंवा अन्य पदावर कार्यरत असलेल्या व्यक्ती संदर्भातील आवश्यक माहिती खालीलप्रमाणे सादर करीत असुन मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की, मी सादर केलेल्या माहितीमध्ये काही दोष/त्रुटी आढळल्यास त्यास मी स्वत: व्यक्तिश: जबाबदार राहील.

१) निविदाधारकाचे किंवा संस्थेचे नाव:—..........................................................................

२) निविदाधारकाचे कायम राहण्याचा पत्ता:—...................................................................

३) संस्थेचे कार्यालयाचा पत्ता:—...................................................................................

४) नोंदणीकृत व्यवसायाचा वर्ग:—..............................................................................

५) निविदाधारक काम करण्याची नोंदणीकृत क्षमता र. रू.:—..................................................

६) निविदाधारक परिवहन महामंडळामध्ये सेवेत/

कुटुंबीय सेवेत आहेत का? होय/नाही

अ) असल्यास त्यांचे नाव

आ) सेवेत असलेले खाते/ विभाग

इ) ज्या पदावर कार्यरत आहेत ते पद :—..........................................................

७) परिवहन महामंडळामध्ये सेवेव्यतिरिक्त अन्य पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तिची माहीती :

.

निविदाधारकाची स्वाक्षरी व नाव

दिनांक :— ......./....../२०२४

ठिकाण :— पुणे

## निविदा क्र. ५३

## निविदा अटी व शर्ती

### हडपसर कमर्शिअल इमारती मधील तळ मजल्यावरील गाळा क्र. बी/६ क्षेत्रफळ २७८ चौ. फुट जागा लिव्ह ॲण्ड लायसेन्सने देणेकामी निविदा

भाग–"अ"

१) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या वरील मिळकती 3+3+3 अशी एकुण ९ वर्षे कालावधीच्या मुदतीकरिता भाडेकराराने विनियोग करणेकरिता जास्तीत जास्त मासिक भाडे रक्कम देऊ करणाऱ्या व्यक्ती/संस्थांकडून टेंडर मागविणेत येत आहेत.

२) सदर कामी निविदा ऑनलाईन www.mahatender.gov.in या पोर्टलचे माध्यमातून भरावयाची आहे.

३) सदर जाहीर निविदेत भाग घेण्याकरीता स्वत:च्या ओळखत्राची (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पॅन कार्ड, वाहन परवाना इ. पैकी दोन पुरावे) तसेच रहिवास पुरावा (मालमत्ता कराची पावती, विद्युत बिलीची पावती, रेशनकार्ड, बॅक पासबुक यापैकी दोन पुरावे) छायांकित प्रत दोन साक्षांकीत करुन सादर करावी.

४) महाटेंडर पोर्टलवर अपलोड केलेली कागदपत्रे तसेच अटी/शर्ती मान्य असल्याबाबत रु. ५००/– च्या स्टॅम्प पेपरवरती नोटरी करुन त्याची प्रत अपलोड करावी. वरील प्रमाणे सर्व अपलोड केलेली कागदपत्रे त्याच्या मुळ प्रती विहीत मुदतीत पुणे महानगर परिवहन महामंडळ यांचे कार्यालयात सादर कराव्यात.

५) निविदा धारकाचे कुटुंबीय पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सेवेत असल्यास, टेंडर सादर करताना या संदर्भातील सर्व माहिती निविदा धारकाने प्रतिज्ञापत्राव्दारे सादर करणे बंधनकारक राहील, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबीय व्यक्तिचे नाव, हुद्दा, निविदा धारकांशी नाते इ. तपशील स्पष्ट नमूद करण्यात यावा.

६) निविदेमध्ये प्रत्यक्ष भाग घेताना गाळयांचा आकार त्या जागा/गाळयांचे भाडे व अधिमुल्य रक्कम इत्यादींची माहिती सोबत **"ब"** लिफाफा मध्ये देण्यात आलेली आहे. त्याची पाहणी करुन खात्री करुन घ्यावी.

७) निविदा धारक संस्था असल्यास नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

८) निविदा धारकास मनपा रजिस्ट्रेशनची अट शिथिल आहे.

९) ज्यांचे टेंडरमंजूर होईल त्या निविदाधारकाने स्वखर्चाने नियमानुसार योग्य त्या किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर भाडेपट्टा करारनामा दुय्यम निबंधक कार्यालय पुणे यांचेकडून करून पुणे महानगर परिवहन महामंडळ यांचेकडेस करुन द्यावा लागेल. त्यासाठी होणारा खर्च मंजुर निविदाधारक यांनी करावायाचा आहे.

१०) निविदा धारकास टेंडरमंजुरीबाबत कळविलेचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत ६ महिन्यांच्या भाडे रक्कमेइतकी रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल. तसेच अनामत रक्कम भरलेपासून १५ दिवसांत करारनामा करणे बंधनकारक राहील.

११) ज्या निविदा धारकाचे टेंडरअमान्य होईल त्यांनी टेंडर रकमेची लेखी मागणी केल्यानंतर ही रक्कम परत देण्याची कार्यवाही दोन महिन्यात करण्यात येईल.

१२) मंजुर निविदा धारकास निविदेतील करारनामा करुन दिल्या शिवाय जागा/गाळयांचा ताबा दिला जाणार नाही.

१३) जागा वापराच्या भाडे कराराची मुदत ९ वर्षे कालावधीची राहील व यामध्ये दर ३ वर्षांनी प्रचलित भाडेरक्कमेवर १२ टक्के वाढ अथवा तद्वेळचा मनपा रेडीरेकनर दर यापैकी जे जास्त असेल ते भाडे अदा करणे बंधनकारक राहील. याबाबत करावयाच्या भाडे कराराच्या स्टॅम्पपेपर, रजिस्ट्रेशन व मसुदा फी इ. तदषंगिक बाबींचा खर्च हा निविदा धारकाने करावयाचा आहे. ३ वर्षानंतर मुदतवाढ द्यावयाची असल्यास त्याबाबतचे सर्व अधिकार परिवहन महामंडळाने राखून ठेवलेले आहेत. शासन स्तरावर भाडेदरातील वाढीसंबंधी होतील ते निर्णय बंधनकारक राहतील.

१४) टेंडरनंतर जागा/गाळेधारकाने जागा/गाळा ताब्यात घेतला नाही व त्यास अंतीम नोटीस देउन सुध्दा गाळा ताब्यात न घेतल्यास सदर गाळंयाचा फेर टेंडरकरण्यात येईल. फेर निविदा गाळयांची रक्कम पुर्वीपेक्षा कमी आल्यास त्याची नुकसान भरपाई संबंधितांकडून वसूल करण्यात येईल व भाडेपट्टेधारकाने भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल.

१५) निविदा धारकाने संस्थेच्या / स्वत: च्या मालमत्तेचे मालमत्ता पत्रक ७/१२ पत्रक सोबत जोडावयाचे आहेत. पात्र निविदा धारकाकडे मालमत्ता पत्रक ७/१२ नसल्यास, ६ महिणे लीज फी रकमेची ३ वर्ष कालावधीची व त्यांनतर नुतनिकरण करावयाची अतिरिक्त बॅक गॅरंटी द्यावी लागेल.

## भाग–“ब”

१) निविदा मान्य झालेल्या निविदाधारकाने कार्यआदेश मिळाल्यानंतर २१ दिवसांत पोलिस व्हेरीफिकेशन सर्टीफिकेट सादर करावयाचे आहे.

२) गाळेधारकास विद्युत कनेक्शन स्वखर्चाने घ्यावे लागेल. नाहरकत प्रमाणपत्र पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत देण्यात येईल.

३) सदरील मिळकतीसाठी पुरेसा वीज पुरवठा व प्रकाश व्यवस्था करणे व त्याची देयके भरणे तसेच पाणी पुरवठा व त्याची देयके भरणे याची जबाबदारी संबंधित निविदाधारकावर राहील.

४) टेंडरमान्यतेनंतर निविदा धारकाने मिळकतीचा ताबा घेतलेनंतर, पुणे शहरामध्ये मिळकती असलेले कोणत्याही दोन व्यक्ती हमीदार/जामीनदार म्हणून त्यांचे शपथपत्र करारनामा करण्यापुर्वी आमच्या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

५) मिळकतीची किरकोळ देखभाल/दुरूस्ती संबंधित निविदाधारकाने स्वत: करावयाची आहे. दुरूस्तीसाठी मोठया प्रमाणावर खर्चाची आवश्यकता असल्यास त्याबाबत परिवहन महामंडळामार्फत पाहणी करून पुढील कार्यवाही करणेत येईल. यासाठी किमान १ महिना आधी पुर्व सुचना देणे आवश्यक आहे.

६) निविदेत घेतलेल्या जागा/गाळयात पोटमाळा तसेच कोणतेही स्ट्रक्चरल बदल पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या पुर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही. तसेच दोन किंवा त्यापेक्षा जादा गाळे एकत्र करता येणार नाही जागा/गाळया समोरील मोकळया जागेवर कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम/अतिक्रमण करता येणार नाही. गाळयासमोर फळी ठेवणे, पायऱ्या करणे, पॅसेज बंद करणे, असे कोणतेही कृत्य करता येणार नाही. केल्यास अटी शर्तीचा भंग समजून पुणे महानगर परिवहन महामंडळ जागा/गाळा ताब्यात घेईल व गाळयाचा भाडेपट्टा संपुष्टात येईल.

७) निविदा धारकाने मिळकतीचा ताबा घेताना ताब्याच्या उर्वरीत संपुर्ण कालावधीच्या भाडे रक्कमेचे आगाऊ धनादेश परिवहन महामंडळाकडील मालमत्ता कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील.

८) भाडेकरार कालावधीमध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळास सदर मिळकतीची काही कारणास्तव गरज भासल्यास अथवा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांनी तसे आदेश दिल्यास किंवा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांना वाटल्यास निविदाधारक यांनी सदर मिळकतीमधील त्यांचे सर्व साहित्य चिजवस्तू वगैरे सर्व स्वखर्चाने त्वरीत हलवून मिळकतीचा खुला ताबा महामंडळाकडे देण्याची व्यवस्था करावयाची आहे.

९) सदर जागेचा वापर हा निविदा धारक यांना व्यवसायासाठीच करता येईल. तथापि, व्यवसायाच्या स्वरूपाबाबत परिवहन महामंडळास कळविणे बंधनकारक असून व्यवसायाच्या स्वरूपानुसार आवश्यक असलेल्या मनपाच्या अन्य विभागाच्या अथवा शासकीय निमशासकीय कार्यालयांच्या परवानग्या घेणे निविदा धारकास बंधनकारक आहे.

१०) सदर जागा/गाळा भाडेपट्टयाने अथवा भाडयाने देता येणार नाही तसेच गहाणखत, दानपत्र, बक्षिसपत्र करता येणार नाही वरील पैकी परिस्थिती आढळून आल्यास भाडेपट्टेधारकाने भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल या कारवाईबाबत कोठेही दाद मागता येणार नाही.

११) निविदा धारकाने दर महिन्याचे १० तारखेच्या आत जीएसटी टॅक्स सह भाडे रक्कम परिवहन महामंडळाकडे जमा करावयाची आहे. तसे न केल्यास अथवा भाडे थकविल्यास, भाडे रक्कम निविदा धारकाकडून तसेच त्यांचे दोन हमीदार/जामीनदार यांचेकडुन वसुल करण्याचा अधिकार परिवहन महामंडळास राहील. याबाबत जामीनदारांचे हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२) भाडे वेळेवर न मिळालेस होणाऱ्या विलंब कालावधीवर १ टक्का प्रतिमहा दराने विलंब शुल्क आकारले जाईल.

१३) सदर जागेचे कोणत्याही कारणाने नैसर्गिक आपत्ती खेरीज नुकसान झालयास नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी भाडेपट्टयाधारकाची राहील.

१४) जागा/गाळाधारकांची भाडेपट्टयांची मुदत संपताच पुणे महानगर परिवहन महामंडळ गाळा ताब्यात घेण्याची कार्यवाही करेल.

१५) मिळकत वापराच्या कराराच्या मुदतीत परिवहन महामंडळाकडे सदर मिळकतीबाबत घेतलेले निर्णय निविदा धारकावर बंधनकारक राहतील.

१६) भाडे रक्कमेव्यतिरिक्त इतर शासकीय व निमशासकीय कर, मिळकत कर, जीएसटी टॅक्स इत्यादी संबंधित व्यक्तिने/संस्थेने भरणे बंधनकारक राहील. तसेच मिळकत कर नियमित मनपाकडे जमा करावा अन्यथा महामंडळाकडे जमा असलेल्या डिपॉझिट मधुन प्रचलित व्याज दरासह वसुल करण्यात येईल याबाबत निविदा धारकाचे कोणत्याही तक्रार अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१७) निविदाधारक यांस किंवा महामंडळास सदर करारानुसार काम करावयाचे नसल्यास अथवा करार रद्द करावयाचा असल्यास संबंधितांनी त्याबाबत दोन महिने अगोदर परस्परांना पुर्व सुचना द्यावयाची आहे. तथापी त्यासाठी कराराचा कालावधी किमान पाच वर्षे पूर्ण झालेला असणे आवश्यक आहे.

१८) मिळकतीचा ताबा कोणतीही पूर्व सूचना न देता करारनामा मुदतीपुर्वीच सोडून दिल्यास अथवा नियम बाह्य कृतीमुळे रद्द झाल्यास जमा केलेली अनामत रक्कम व त्यावरील व्याज निविदा धारकास मागण्याचा अधिकार राहणार नाही.

१९) लवाद प्रक्रिया कायद्यातील तरतुदीनुसार राहील.

२०) कोणताही वाद पुणे क्षेत्र न्यायालयामध्ये राहील.

२१) जागा वापराच्या कालावधीमध्ये सदरील मिळकतीची देखभाल व दुरूस्ती संबंधित निविदाधारकाने करावयाची असुन कराराची मुदत संपल्यावर मिळकत सुस्थितीत परिवहन महामंडळाच्या ताब्यात देणे निविदाधारकावर बंधनकारक आहे. त्याबाबत निविदाधारकास कोणत्याही प्रकारची हरकत घेता येणार नाही. निविदाधारकाकडून जागेचे नुकसान झालेस नुकसान भरपाईची रक्कम परिवहन महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे भरणे बंधनकारक राहील.

२२) सदरील मिळकतीची वेळोवेळी तपासणी करण्याचे अधिकार परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना राहतील व अशा प्रसंगी संबंधित भाडेकरू यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा करता येणार नाही.

२३) सदर व्यापारी संकुलातील जागा/गाळयांमध्ये तयार होणारा कचरा ओला व सुका वेगवेगळा करुन घंटागाडीत टाकणे जागा/गाळा व गाळयाचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी भाडेपट्टाधारकाची राहील.

२४) सदरील गाळे/जागामध्ये होणाऱ्या व्यवसायापासून आजुबाजुच्या रहिवाशांना व नागरिकांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव वा त्रास होणार नाही याबाबतची योग्यती दक्षता निविदा धारकानी घ्यावयाची आहे.

२५) सदर जागेचे मुल्य बऱ्याच प्रमाणात कमी होणे याचा किंवा जागेच्या उपयुक्तेस बऱ्याच प्रमाणात नुकसान पोहोचण्याचा ज्यामुळे संभव असेल अशी कोणतीही हानिकारक कृत्ये करता येणार नाहीत.

२६) मिळकतीची संपूर्ण संरक्षणाची व देखभालीची जबाबदारी संबंधीत निविदा धारकावर राहील.

२७) वेळोवेळी पुणे महानगर परिवहन महामंडळाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे लागेल.

२८) वरील अटी शर्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही अटी शर्तीचा समावेश करारनाम्यामध्ये करण्याचा अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

२९) सदर निविदेसंबंधी प्रिबिड मीटींग दि.   /   /२०२४ रोजी दु. ३.०० वा संपन्न होईल. इच्छुक निविदाधारकांनी शंकांबाबत प्रिबिड मीटींग पूर्वी किमान १ दिवस आधी लिखीत स्वरुपात अथवा महामंडळाच्या मालमत्ता विभागातील ई–मेल आयडी क्र. landandestate@pmpml.org वर पाठविणे आवश्यक आहे.

३०) टेंडरअनुषंगाने वेळोवेळी होणारे बदलाबाबत सूचना महामंडळाचे www.pmpml.org या संकेतस्थळावर (वेबसाईट) www.mahatender.gov.in या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल.

उपरोक्त नमुद केलेल्या टेंडरप्रक्रियेबाबतच्या एकुण १ ते २९ अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचलेल्या असुन समजुन घेतलेल्या आहेत. सदर अटी शर्ती मला बंधनकारक आहेत.

पुणे दिनांक : –

ठिकाण : –

निविदाधारकाची स्वाक्षरी व नाव

## निविदा क्रमांक ५३

“ब” लिफाफा – निविदेतील दर

हडपसर कमर्शिअल इमारती मधील तळ मजल्यावरील गाळा क्र. बी/६ क्षेत्रफळ २७८ चौ. फुट जागा लिव्ह अॅण्ड लायसेन्सने देणेकामी निविदा

| जागेचे ठिकाण | मजला | क्षेत्र चौ. फुट | गाळा/जागा लिव्ह अॅण्ड लायसेन्सने पूर्वगणन मासिक रक्कम (मनपा रेडिरेकनर दरानुसार रक्कम रू.) | निविदादाराने नमूद केलेली अॅण्ड लायसेन्सची मासिक रक्कम रू. (कर अतिरिक्त) |
|---|---|---|---|---|
| हडपसर कमर्शिअल इमारत | तळ मजला गाळा क्र. बी/६ | २७८ | २४,५४७/– | |

दिनांक :........./ ......../२०२४
स्थळ : पुणे

अर्जदाराची स्वाक्षरी

**पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या इमारतीमधील भाडेतत्वावर उपलब्ध असलेल्या रिक्त जागांचा तपशील.**

पुणे शहरात उद्योग व्यवसायाच्यादृष्टीने हडपसर, डेक्कन, मार्केटयार्ड, व न.ता.वाडी डेपो येथील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी महामंडळाच्या इमारतींमध्ये सरकारी कार्यालये, निमसरकारी कार्यालये, बॅंका, खाजगी संस्था, व्यवसायिक व्यक्ती इत्यादिंना कार्यालयासाठी ०३ ते ०९ वर्ष कालावधीकरीता जागा तसेच विविध डेपोंना सेवकांसाठी कॅन्टीन सुविधेकरीता मोकळी जागा लिव्ह अॅण्ड लायसेन्स पध्दतीने देण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. संबधित जागांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | जगेचे ठिकाण | निविदा क्र. | कार्यालय/व्यवसायासाठी उपलब्ध असलेली जागा (चौ.फुट) | टेंडर फॉर्म फी जीएसटीसह रक्कम रूपये | बयाणा रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | डेक्कन कमर्शियल इमारत क्र.३ | ३७/२०२४–२५ | पार्किंग मजला (३००) | २,००६/– | ८,५००/– |
| २ | | ३८/२०२४–२५ | तिसरा मजला (५५००) | २०,०६०/– | १,७०,०००/– |
| ३ | | ३९/२०२४–२५ | पाचवा मजला (९६६८) | २३,६००/– | २,००,०००/– |
| ४ | हडपसर कमर्शियल इमारत क्र.३ | ४०/२०२४–२५ | पहिला मजला (२५००) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| ५ | | ४१/२०२४–२५ | पहिला मजला (२५००) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| ६ | | ४२/२०२४–२५ | पहिला मजला (५०००) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| ७ | | ४३/२०२४–२५ | दुसरा मजला (२५००) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| ८ | | ४४/२०२४–२५ | दुसरा मजला (५०००) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| ९ | | ४५/२०२४–२५ | दुसरा मजला (२५००) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| १० | | ४६/२०२४–२५ | चौथा मजला (२५००) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| ११ | | ४७/२०२४–२५ | चौथा मजला (७५००) | २०,०६०/– | १,७०,०००/– |
| १२ | | ४८/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. अे/५ (२७८) | २,००६/– | ८,५००/– |
| १३ | | ४९/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. अे/११ (२७८) | २,००६/– | ८,५००/– |
| १४ | | ५०/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. बी/३ (२७८) | २,००६/– | ८,५००/– |
| १५ | | ५१/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. बी/४ (२७८) | २,००६/– | ८,५००/– |
| १६ | | ५२/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. बी/५ (३३७) | २,००६/– | ८,५००/– |
| १७ | | ५३/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. बी/६ (२७८) | २,००६/– | ८,५००/– |
| १८ | | ५४/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. बी/८ (२८१) | २,००६/– | ८,५००/– |
| १९ | | ५५/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. बी/९ (२७८) | २,००६/– | ८,५००/– |
| २० | | ५६/२०२४–२५ | तळ मजला गाळा क्र. बी/१५(३२७) | २,००६/– | ८,५००/– |
| २१ | मार्केटयार्ड आगार कम. इमारत | ५७/२०२४–२५ | पहिला मजला (२७१५) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| २२ | न.ता.वाडी आगार कम. इमारत | ५८/२०२४–२५ | पहिला मजला (५१९०) | २०,०६०/– | १,७०,०००/– |
| २३ | | ५९/२०२४–२५ | पहिला मजला (३२२५) | ६,०१८/– | ८५,०००/– |
| २४ | स्वारगेट सेन्ट्रल वर्कशॉप (कॅन्टीन) | ६०/२०२४–२५ | मोकळी जमीन( २००) | २,००६/– | ८,५००/– |
| २५ | कोथरूड आगार(कॅन्टीन) | ६१/२०२४–२५ | मोकळी जमीन (१५०) | २,००६/– | ८,५००/– |
| २६ | शेवाळवाडी आगार (कॅन्टीन) | ६२/२०२४–२५ | मोकळी जमीन (१५०) | २,००६/– | ८,५००/– |
| २७ | भोसरी आगार(कॅन्टीन) | ६३/२०२४–२५ | मोकळी जमीन (१५०) | २,००६/– | ८,५००/– |
| २८ | निगडी आगार(कॅन्टीन) | ६४/२०२४–२५ | मोकळी जमीन (१५०) | २,००६/– | ८,५००/– |

निविदा भरण्यास इच्छुक निविदादारांना महाराष्ट्र राज्य शासनाचे www.mahatenders.gov.in या पोर्टलवरून निविदा फॉर्म भरून फॉर्म उपलब्ध होईल. निविदा संबंधीत आवश्यक कार्यवाहीचे दिनांक पुढीलप्रमाणे आहेत.

१) ऑनलाईन फॉर्म विक्री दि. ०५/१२/२०२४ ते दि. १८/१२/२०२४ पर्यंत.

२) ऑनलाईन फॉर्म स्वीकृती दि. ०५/१२/२०२४ ते दि. १८/१२/२०२४ वेळ. ०२:३०वा. पर्यंत

३) प्रिबिड मिटींग दि. १३/१२/२०२४ वेळ. ०३:००वा. पर्यंत

४) निविदांचा तांत्रीक भाग उघडणे दि. १९/१२/२०२४ वेळ. ०३:००वा.

www.mahatenders.gov.in या पोर्टलवर निविदा कामकाजाबाबत संपूर्ण तपशीलासाठी निविदा फॉर्म उपलब्ध आहेत.

सही/—
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.